रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट या पथदर्शी कार्यक्रमांतर्गत चांदा ते बांदा या योजनेंतर्गत चंद्रपुर जिल्ह्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-२०१६/प्र. क्र. १५२/पदुम १३
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: ०५ एप्रिल, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः डीएपी-१०१५/ प्र. क्र. ५१/ का. १४८१, दि. २९.०६.२०१६
२) शासन निर्णय क्रमांकः डीएपी-१०१५/ प्र. क्र. ५१/ का. १४८१, दि. ०७.०७.२०१७

प्रस्तावना -

राज्याच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये “महाराष्ट्राच्या दोन टोकावरील चंद्रपुर व सिंधुदुर्ग हे खनिज व नैसर्गिक संपत्तीचे वरदान लाभलेले जिल्हे आहेत. या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर व्हावा यासाठी सघन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्यात येईल” अशी घोषणा करण्यात आली होती. सदर घोषणेस अनुसरुन चंद्रपुर व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आर्थिक विकास करण्यासाठी चांदा ते बांदा या पथदर्शी योजनेस नियोजन विभागाने वाचा-१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

चंद्रपुर जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर करून त्याप्रमाणे मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मत्स्यबीज निर्मितीसाठी प्रोत्साहन, फिश फिड मिल व मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करून देणे या ३ योजना चंद्रपुर जिल्ह्यात राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय -

चांदा ते बांदा योजनेंतर्गत चंद्रपुर जिल्ह्यासाठी खालील योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	परिणाम /उद्दिष्ट	अपेक्षित खर्च (रू. लाखात)
१	मत्स्यव्यवसाय सह संस्थांना मत्स्यबीज निर्मितीसाठी प्रोत्साहन	२० मच्छिमार सहकारी संस्था	रू. ५०२.८०
२	फिश फिड मिल	१० मच्छिमार सहकारी संस्था/ बचत गट	रू. ७८.००
३	मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करून देणे	१२ मच्छिमार सहकारी संस्था	रू. ११०.१६

उपरोक्त तक्त्यात नमूद अ. क्र. १ येथील योजनेस नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४/का १४१८/२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र १८०/२०१८ अन्वये वित्तीय अधिकार नियम १९७८ भाग-पहिला उपविभाग ३ मधील अ.क्र. ४ नियम-२७(२) मधील तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच अ. क्र. २ व ३ येथे नमूद योजनांना जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी प्रशासकीय मान्यता द्यावी. तसेच उपरोक्त तीन्ही योजनांना तांत्रिक मान्यता आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रदान करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०५१३५१३५६७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran V Kurundkar

Digitally signed by Kiran V Kurundkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f89b7a82db2238fb7337a9a9b8e00b9c1a35b509d1f6850ddcc783bdb12090f, cn=Kiran V Kurundkar
Date: 2018.04.05 13:52:54 +05'30'

(किरण कुरुंदकर)

सचिव (पदुम)

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
५) सर्व सन्माननीय सदस्य विधानसभा / विधान परिषद / संसद सदस्य
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) सचिव, पदुम, मंत्रालय, मुंबई
९) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
११) प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, नागपूर
१२) सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, चंद्रपूर.
१३) महालेखपाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता), मुंबई
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपुर.
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६) निवासी लेखाधिकारी, मुंबई
१७) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८) वित्त विभाग (व्यय-२ /अर्थ-१५/ ऋण व हमी) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१९) निवड नस्ती.